# भीती

नीलिमा किराणे

विक्रमादित्याने हट्ट सोडला नाही. तो पुन्हा झाडापाशी गेला. वेताळाला खांद्यावर घेऊन चालू लागला.

वेताळ म्हणाला, "राजा, तू फार जिद्दी आहेस. आज लौकिक नावाचा मुलगा आणि त्याची आई सुप्रिया यांची गोष्ट मी तुला सांगतो. माझ्या जादूमुळे हे प्रसंग समोर घडत असल्यासारखे तुला दिसतील. बघ." वेताळ सांगू लागला.

कुरिअरवाल्याला सही देण्यासाठी लौकिकच्या दप्तरातून पेन काढताना सुप्रियाला ती चिठ्ठी दिसली. चार दिवसांपूवीची तारीख. लौकिकचं होमवर्क महिनाभर सतत अपूर्ण होतं. त्याबद्दल तिला क्लासटीचरनी शुक्रवारी शाळेत भेटायला बोलावलं होतं. सुप्रियाचा चेहरा संतापानं लाल झाला. "लौकिक, ही चिठ्ठी का दाखवली नाहीस? शाळेत टीचरनं भेटायला बोलावल्याची?" सुप्रियानं चढया आवाजात विचारलं. 'अशाच चिठ्ठया का येतात याच्या नेहमी? कायम काहीतरी लपवत असतो. शुक्रवारी शाळेत जायचं म्हणजे हाफ डे टाकणं आलं. नेमकं त्याच दिवशी नव्या प्रोजेक्टचं प्रेझेंटेशन. त्याची वेळ बदलायला बॉसला विनंती करावी लागणार..'.सुप्रिया स्वतःशीच पुटपुटत होती. '..मग तो खवचट चेहऱ्यानं म्हणणार, "यू नो सुप्रिया, तुम्ही बायका काम करता तेव्हा चांगलं करता, पण प्रोफेशनॅलिझम कमी पडतो तुमच्यात.."' त्या कल्पनेनंच सुप्रिया आणखी तडकली. कुठे गेला हा लौकिक? "लौकिक, लौकिक.." हाकेगणिक तिचा आवाज चढत राहिला.

सुप्रियाच्या आवाजानं थरकाप झालेला लौकिक पटकन टॉयलेटमधे घुसला. 'झालं. गंडलो आता. ती चिठ्ठी दिसलीच कशी? आईलापण माझंच पेन कशाला पाहिजे होतं? आता..? आता नेहमीचंच घडणार. आई बोल बोल बोलणार, रागावणार, शेवटी रडायला लागणार. मग बाबा तिची समजूत घालणार. तो पण आपल्यावर चिडणार...' मनाशी हे पुटपुटत असतानाच त्या कल्पनेनं लौकिक ताठरत गेला.

•••

एकीकडे कॉम्प्युटरवर काम करत सुप्रिया लौकिकचा अभ्यास घेत होती. ती पटापट सांगत होती पण लौकिकला आजिबात समजत नव्हतं. सुप्रिया वैतागली.

"मला आताशा आजिबात वेळ नसतो, प्रमोशन मिळाल्यापासून काम वाढलंय आणि तुला पूर्वीसारखं पटापट कळतच नाहीये. किती सोप्पं आहे. मला तर लहानपणी हे इतकं पटकन यायचं. तुला किती वेळा समजावून सांगितलं तरी चेहरा मख्खच तुझा. मधे पाय मोडून शाळा बुडाली तेव्हापासून तर आजिबात लक्ष नसतं कुठं. एवढं कसं कळत नाही तुला?"

"अभ्यास खूप वाढलाय ग आई.जिऑग्राफी आणि सिव्हिक्स मधले तर शब्दच कळत नाहीत. मग कंटाळा येतो."

"कंटाळा कसला येतो? जास्त वेळ करायचं. मार्क चांगले पडलेच पााहिजेत. तुझ्यासाठी तर एवढे कष्ट करतोय आम्ही दोघं. लौकिक, तुला ना, समजून घेण्यापेक्षा काहीतरी कारणं सांगून वेळ काढणंच बरं वाटायला लागलंय हल्ली." खाली मान घालून मुकाट ऐकणाऱ्या लौकिकचे कान आणि मेंदू बंद झाल्यासारखे राजाला वाटले.

•••

मख्ख चेहऱ्यानं लौकिक वर्गात उभा होता. "लक्ष कुठे असतं हल्ली लौकिक? प्रश्न विचारला तर नुसता उभा राहतोस.. सगळया शिक्षकांची

तक्रार आहे तुझ्याबद्दल. जवळजवळ दर तासाला उभा असतोस. होमवर्क नाही म्हणून, नाहीतर बडबड केली म्हणून..उद्या पालकांना भेटायला बोलावलंय म्हणून सांग.' टीचर रागवत होत्या. 'त्याला काही येतच नाही टीचर..' कुणीतरी मागून कॉमेंट केली आणि सगळा वर्ग हसत राहिला.
"बाबा टूरवर गेलेत टीचर आणि आईला बरं नाहीये..." लौकिक पटकन बोलून गेला.
"ठीक आहे. मी चिठ्ठी देते. शुक्रवारी बोलाव आईला." टीचरनं चिठ्ठी दिली. मधल्या सुट्टीतही मुलं लौकिकला हसत होती. टिंगल करत होती.

•••

घरात लौकिक खाली मान घालून उभा होता. बाबा जोरजोरानं येरझारा घालत होते. आईअतिशय चिडली होती. "लौकिक, हे काय ऐकतेय मी? गेले आठ महिने तू माझ्याशी एवढं खोटं बोललायस? टीचरचे निरोप, चिठ्ठ्या दिल्या नाहीस.वर मला किती वेळा आजारी पाडलंस? बाबा काय सहा महिने टूरवरच होते काय? किती खोटं? आणि कशासाठी? आम्ही काय कमी केलं रे तुला? आम्ही तुझ्यावर विश्वास ठेवला आणि तू एवढं सहज फसवलंस आम्हाला? हेच संस्कार केले का आम्ही तुझ्यावर? टचिरनं भेटायला बोलावलं म्हणून कळलं तरी. नाहीतर आणखी किती दिवस तू आम्हाला असं फसवत राहिला असतास?"

"मला वर्गातलं काही कळत नाही आई. हल्ली तुला पण शिकवायला वेळ नसतो..."

"वर तोंड करून बोलू नकोस. मला वेळ नाही म्हणून तर टयूशन क्लासला घातलं ना एवढया महागाच्या? काय दिवे लावले? तुला कशाची किंमतच नाहीये.. तुझ्या टीचरसमोर काय बोलावं ते कळत नव्हतं आम्हाला. धक्क्यामागून धक्केच बसत होते. जाऊ दे. पुढच्या वर्षी होस्टेललाच ठेवते तुला म्हणजे आमची किंमत कळेल आणि शिस्त पण लागेल.."

होस्टेलच्या नावाने हादरून लौकिक हळूच खोलीच्या बाहेर गेला तरी आई वैतागून बाबांशी बोलतच होती. "किती सराईतपणे खोटं बोलला तो? आपल्या संस्कारात काय कमी पडलं? असा कसा बिघडला? घरात पैसेपण असेच कुठेही पडलेले असतात. तेही घेत असेल का तो? विश्वास कसा ठेवू मी या मुलावर? सारखं लक्ष ठेवायचं म्हटलं तर मला नोकरी सोडावी लागेल."

•••

आपल्या अंथरूणावर पडून लौकिक मूकपणे रडत होता. खूप वेळ रडून झाल्यावर तो निग्रहानं उठला. त्यानं शांतपणे डोळे पुसले. अतिशय कोरडेपणानं त्यानं समोरच्या आरशातल्या स्वतःच्या प्रतिबिंबावर नजर टाकली. त्याच्या नजरेत आता एक आव्हान होतं.

विक्रमादित्याच्या डोळयांसमोरून पुढचे अनेक प्रसंग झरझर सरकून गेले. त्याला बोलणं ऐकू आलं नाही. पण लौकिकला रागावणारे, वैतागून बोलणारे आई, बाबा, आजी आजोबा आणखी कोणीकोणी राजाला दिसले. लौकिक बेरड चेहऱ्यानं उभा होता. उलटून बोलत होता. निरर्थक वाद घालत होता. आक्रस्ताळेपणा करत होता. घरच्यांना या निगरगट्टपणाचा संताप येत होता.
खोटं बोलूनच्या बोलून वर असा माजलेपणा त्यांना सहनच होत नव्हता.

५ ५

झरझर दिसणारे युद्धप्रसंग थांबले. वेताळ राजाला म्हणाला,

"राजा, या घरातली शांतता संपली आहे. मला घरच्यांच्या अपेक्षा योग्य वाटतात. त्यांनी लौकिकला काहीच कमी केलेलं नाही, सगळे लाड पुरवलेत. तरीही लौकिक अभ्यास का करत नसेल? पुन्हापुन्हा खोटारडेपणा का करत असेल? निगरगट्टपणे का वागत असेल? या

प्रश्नांची उत्तरं तुला माहीत असून तू दिली नाहीस तर तुझ्या डोक्याची शंभर शकलं होऊन . . . ”

“लौकिकचा खोटारडेपणा हा आईवडिलांना धसका बसवणारा प्रकार आहेच. त्यामुळे आपल्या संस्कारांत काही चुकलं का? असं वाटून ते स्वतःला दोषी समजतात. लौकिकवर संतापतात. त्यांच्या संतापामागे प्रत्यक्षात दोन प्रकारच्या भीती आहेत. ‘खोटं बोलायला लागला म्हणजे लौकिक वाया गेला’ आणि ‘लोक म्हणतील, आईबापांना मुलाला वळण लावता आलं नाही’ या त्या भीती आहेत. त्यांच्या चिडचिडीमागच्या या भीती समजून घ्यायला लौकिक लहान आहे.

लौकिकचा वाढता खोटारडेपणा आणि भरीला निगरगट्ट वागणं हे पालकांना दिसतंय. पण दुसऱ्या बाजूला लौकिकच्या मनात डोकावून पाहिलंस तर त्याच्याही मनात भीतीचीच भावना दिसेल वेताळा. आई बाबांना आपण आवडत नाही, टीचर रागावतात, शिक्षा होते, मित्र हसतात, नापास होण्याची भीती, आई बोर्डिंगला ठेवायचं म्हणते, . . अशा असंख्य भीतींनी लौकिकचं मन ग्रासलंय. या सगळया भीतींना पार करून त्याला अभ्यासात एकाग्र व्हायला हवं, तो प्रयत्न करतही असेल पण त्याला वर्गात समजतही नाहीये. त्याचा कोंडमारा होत असणार. तो एवढा लहान आहे की अशा प्रकारचं विश्लेषण तो करू शकत नाही. त्याला फक्त प्रचंड भीती वाटते. त्यातच तो अडकून राहतो. त्याची मनःस्थिती समजून घेऊन घरच्यांनी मदत करायला हवी, कारण ते मोठे आहेत.’

वेताळाला पटेना. “राजा, अरे लौकिक पुन्हापुन्हा खोटारडेपणा करतोय. तरीही त्याला रागवायचं नाही? समजून घ्यायचं? ”

“वेताळा, तूही लौकिकच्या आईबाबांसारखाच विचार करतोयस. नेहमीच्या चौकटीतून थोडा बाहेर येऊन लौकिककडे बघ ना. त्याला खोटारडेपणा आवडतो किंवा घरच्यांना फसवून काहीतरी करायचंय म्हणून

तो खोटं बोलत नाही, तर आपला कमीपणा दिसू नये म्हणून खोटं बोलतोय. आई रागवेल या भीतीतून बोलतोय. त्या छोटयाचं ते स्व-संरक्षण आहे रे. त्यालाही आत्मसन्मान आहे. सगळयांकडून सगळया गोष्टींसाठी त्याला हाडहुड आणि अविश्वासच मिळतोय. लौकिकला घरच्यांचं प्रेम, कौतुक हवंय. गेलेला आत्मसन्मान परत हवाय. ते आणखी दूर गेलं तर लौकिक खच्ची होईल की सुधारेल?

"लौकिकचा खोटारडेपणा हा परिणाम आहे. खोटारडेपणाचं कारण आहे त्याच्या मनातली सततची भीती. पण आईबाबांसाठी हा परिणामच एवढा भयंकर आहे की त्यांचं सगळं लक्ष परिणामाकडे जातंय. ते कारणापर्यंत पोहोचतच नाहीयेत. दोघांच्याही वागण्यातलं 'कशाचीतरी भीती आणि त्यातून वाटणारी असुरक्षितता' हे कारण संपल्याशिवाय परिणाम बदलेल का वेताळा?

"खरं आहे तुझं राजा. पण मग आता उपाय काय?"

"सांगतो. सुप्रियानं आधी आपल्या आणि लौकिकच्या मनातल्या भीतींकडे नीट पाहायला हवं. लौकिकचा खोटारडेपणा कळल्याबरोबर तिला लगेच घरातल्या पैशांची आठवण आली. लौकिक बिघडला म्हणजे तो आता चोरीसुद्धा करणार हे तिनं गृहीतच धरलं. ती शक्यता असू शकते पण सध्या तरी ही भीती काल्पनिकच आहे, हे सुप्रियानं समजून घ्यायला हवं. या शंकेतून सुप्रिया जे वागेल त्यातून लौकिकपर्यंत तिच्या मनातला अविश्वासच पोहोचणार. उद्या लौकिक म्हणू शकतो, 'मी कसाही वागलो तरी आईचा माझ्यावर विश्वासच नाही. मग मी तरी कशाला खरं वागू?' म्हणून आपल्या मनातल्या काल्पनिक अवास्तव भीतीतून सुप्रियानं बाहेर यायला पाहिजे. आपल्याच अपेक्षांभोवती फिरत राहणं जरा वेळ बाजूला ठेवून आधी लौकिकच्या मनातल्या भीतींपर्यंत पोहोचलं पाहिजे. लौकिक निगरगट्टपणाचा आव आणत असला तरी तो अतिशय हळव्या मनस्थितीत आहे. ती मनस्थिती पकडली पाहिजे. त्याला प्रेम, विश्वास दिला पाहिजे. आधी हळुवारपणे, नंतर क्वचित थोडया कठोरपणे त्यातून

त्याला मोकळं केलं पाहिजे. विश्वास आणि आत्मसन्मानासाठी तो खोटं बोलायला लागलाय. ते दोन्ही मिळालं की खोटं बोलण्याची गरज पडणार नाही. हळूहळू ते आपोआप थांबत जाईल."

"मला नाही पटत. लैकिक कसाही वागला तरी कौतुक करायचं का राजा?"

"आजिबात नाही. वागणं समजून घेणं आणि कौतुक करणं यात फरक आहे. 'आम्ही तुझ्यासाठी कायकाय करतो आणि तू कसा चुकीचंच वागतोस' हा त्यांचा नेहमीचा संवादाचा पॅटर्न झालाय. तो मोडायचा. त्याऐवजी,

"लौकिक, तुला मी रागवेन याची भीती वाटतेय का रे? म्हणून खोटं बोलतोयस का?' अशा पद्धतीनं त्याच्या मनातल्या भीतीपर्यंत पोहोचायचं." आईला आपल्या मनातल्या भावना कळतायत हे समजल्यावर त्याचा ताण कमी होईल, तो मोकळा व्हायला लागेल."

'तुला वाटतं राजा यातून काही चांगलं घडेल?'

"अर्थात. आजपर्यंतच्या वागण्या बोलण्याच्या पद्धतीमुळे परिस्थिती बिघडली आहे. तसंच उद्याही वागत राहिलं तर ती आणखी बिघडेलच ना? एवढया दिवसांची सवय संवाद बदलला की लगेच एका दिवसात बदलणार नाही, पण बदलायला सुरूवात नक्की होईल. आत्मविश्वास हरवलेल्या, दुखावलेल्या लौकिकवर क्षणात फुंकर बसायला माणसांकडे तुझ्यासारखी जादू नसते वेताळा." राजा मिश्किलपणे म्हणाला.

राजाचं मौन सुटलं होतं, पण वेताळ विचारांतच अडकला होता. अचानक त्याला आठवण झाली आणि राजाच्या खांद्यावरून अदृष्य होऊन तो झाडाला जाऊन लोंबकळू लागला.

•••

लोकसत्ता - चतुरंग - गोष्टी भावभावनांच्या- जानेवारी २०१२